# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
## कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

१४ फेब्रुवारी, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800

: 7276494810 (PRO)


## चंद्रपूर पोलीसांची अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कार्यवाही

जिल्हयात दारूबंदी घोषीत झाल्यापासुन अवैध दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर चंद्रपूर जिल्हा पोलीस प्रभावी कार्यवाही करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. यादरम्यान दिनांक १३/०२/२०१९ रोजी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **चंद्रपुर शहर, रामनगर, बल्लारशाह, वरोरा, माजरी, तळोधी, मुल, राजुरा, विरूर, कोठारी** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **१५** गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन १२ आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयात एकुण **१,४१,८००/—रू.** चा मुदद्येमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

———————————————————————————————————————

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

# जिल्हा स्कुल बस सुरक्षा समितीची बैठक

## पोलीस अधीक्षक यांचेकडुन नियामांचे पालन करण्याबाबत सुचना

शालेय विद्यार्थ्यांची शाळेमध्ये ने–आन ही सुरक्षीतरित्या व्हावी याकरीता महाराष्ट्र मोटार वाहन (स्कुलबस करिता विनियम) नियम– २०११ च्या शासन निर्णयानुसार जिल्हा पोलीस अधीक्षक हे जिल्हा स्कुलबस सुरक्षा समितीचे अध्यक्ष आहेत. जिल्ह्यात स्कुलबसने विद्यार्थ्यांची ने–आन करतांना विद्यार्थ्यांना धोका होवु नये तसेच कोणत्याही प्रकारचा अपघात होवु नये यासंदर्भात जनजागृती करीता दि. १३/०२/२०१९ चे १६:०० वा. पोलीस अधीक्षक कार्यालयात पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी शहरातील शाळांच्या मुख्याध्यापक/प्राचार्य यांना बोलावुन बैठकीचे आयोजन केले होते.

३० जानेवारी रोजी बि.जे.एम. कारमेल ॲकेडमी, चंद्रपुर येथील विद्यार्थ्याचा शाळेच्या वेळेत अपघात होवुन मृत्यु झाला. अशा प्रकारच्या दुर्दैवी घटनांची पुनरावृत्ती होवु नये याकरीता पोलीस अधीक्षक यांनी या बैठकीचे आयोजन केले होते. प्रत्येक शाळास्तरावर शाळेतील मुलांची सुरक्षितपणे ने–आण करणे, परिवहन शुल्क व बस थांबे निश्चित करणे या बाबींकडे लक्ष देण्यासाठी प्रत्येक शाळेची एक परिवहन समिती स्थापण करण्याबाबत सर्व शाळांना सुचना दिल्या. स्थापित समितीकडुन वाहनांची कागदपत्रे जसे नोंदणी प्रमाणपत्र, योग्यता प्रमाणपत्र, विमा प्रमाणपत्र, परवाना, वायु प्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्र, वाहन चालविण्याचे लायसन्स, अग्नीशामक, प्रथमोपचार पेटी ईत्यादींची पडताळणी करण्यात यावी. या समितीचे अध्यक्ष हे शाळेचे प्राचार्य राहतील, एक पालक–शिक्षक संघाचा प्रतिनिधी, संबंधित क्षेत्राचा वाहतुक निरीक्षक किंवा पोलीस निरीक्षक, त्या क्षेत्राचा मोटार वाहन निरीक्षक किंवा सहायक मोटार वाहन निरीक्षक, शिक्षण निरीक्षक, बसच्या कंत्राटदाराचा प्रतिनिधी आणि स्थानिक प्राधिकरणाचा प्रतिनिधी यांचा समितीत समावेश असेल. समितीची तीन महिन्यातून किमान एकदा व प्रत्येक सत्र सुरु होण्याच्या पुर्वी बैठक घेण्यांत येईल. विद्यार्थ्यांच्या सुरक्षीत प्रवासाकरीता शाळेचे प्राचार्य/मुख्याध्यापक जबाबदार राहतील अशी सुचनाही पोलीस अधीक्षक यांनी दिली.

स्कुलबस मधील प्रथमपोचार पेटी व योग्य औषधे बसमध्ये आहेत, हे प्राचार्यांनी दर महिन्याला चेक करण्याबाबतही मा. पालीस अधीक्षक यांनी सांगीतले. तसेच वाहनासोबत ने–आण करणाऱ्या शाळेतील मुलांची संपूर्ण यादी असेल ज्यामध्ये प्रत्येक विद्यार्थ्याचे नांव,

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

वर्ग, निवासाचा पत्ता, संपर्क क्रमांक, रक्तगट आणि विद्यार्थ्याला चढण्याकरीता व उतरण्याकरीता घराजवळील थांबण्याचे ठिकाण, या गोष्टी नमुद केलेल्या असतील. यादीमध्ये मुळ ठिकाण, समाप्तीचे ठिकाण आणि वापरण्यात येणारा मार्ग, शैक्षणिक संस्थेच्या मुख्य व्यक्तीकडून साक्षांकित नमुद केलेला असेल तसेच शिशुवर्गातील मुलांच्या बाबतीत जर अधिकृत व्यक्ती (शाळा आणि पालक यांनी परस्पर सहमतीने मान्यता दिलेली व्यक्ती) बस स्टॉपवर मुलाला घ्यायला आली नाही तर, त्या मुलाला पुन्हा शाळेत पाठविण्यात येईल आणि त्याच्या पालकांना बोलावून ते मुल त्यांना घेऊन जाण्यास सांगण्यात येईल अशा सुचना दिल्या.

सर्व शाळांनी विद्यार्थी शाळेच्या गेटच्या आत शाळेत सोडावे व गेटच्या आतमधुनच बसमध्ये घ्यावे. कोणतीही शाळा मुलांना गेटच्या बाहेर बसमध्ये बसल्या व्यतिरिक्त किंवा पालकांच्या शिवाय बाहेर जावु देणार नाही. शाळेला आत जाण्यासाठी व बाहेर जाण्यासाठी असे दोन गेट वेगळे ठेवावे. कॅनव्हास हुड असलेल्या वाहनाचा कुणीही विद्यार्थी सोडण्यासाठी वापर करणार नाही असे सक्त निर्देश यावेळी देण्यात आले. अवैधपणे विद्यार्थ्यांची ने–आन करणाऱ्या वाहनांवर उप प्रादेशिक परिवहन अधिकारी व पोलीस निरीक्षक, वाहतुक शाखा, यांनी संयुक्तपणे कार्यवाही करण्याबाबतच्या सुचना पोलीस अधीक्षक यांनी दिल्या. सुचनांचे काटेकोरपण पालन न करणाऱ्या शाळांवर कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल अशा सुचना सुध्दा बैठकीत देण्यात आल्या. या बैठकीस शहरातील ३९ शाळांचे प्रतिनिधी हजर होते त्याबरोबरच उप प्रादेशिक परिवहन अधिकारी तथा स्कुलबस सुरक्षीतता समितीचे सदस्य सचिव श्री विशांभर शिंदे व जिल्हा वाहतुक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक जयवंत चव्हाण उपस्थित होते.

# स्टंटबाजी आणि कर्कश हॉर्न वाजविणारे दुचाकी वाहन चालकांवर पोलीसांची कडक कार्यवाही
# ९ दुचाकी वाहतुक शाखेत जमा

युवकांमध्ये टुव्हीलर चालविण्याची खुप क्रेझ आहे. परंतू काही युवक टुव्हीलर चालवितांना दुरुपयोग करीत विनाकारण कर्कश हॉर्न वाजविणे, जोरात व कर्कश आवाज येईल असे सायलन्सर लावुन गाडया चालवितात यामुळे सर्वसामान्य जनतेला त्रास होउन अपघात सुध्दा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सामान्य जनतेच्या सुरक्षिततेची काळजी घेत पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी अशा वाहन चालकांवर कार्यवाही करण्याची मोहिम हाती घेत वाहतुक पोलीसांना निर्देश दिले आहेत.

दि. १३/०२/१९ रोजी रात्री १०:०० वा. दरम्यान वाहतुक पोलीसांनी रामाळा तलाव येथे नाकाबंदी लावुन स्टंटबाजी करणारे/नंबर प्लेट नसलेले सुमारे ०९ वाहने ताब्यात घेउन सर्व वाहन चालकांवर वाहतुक शाखा, चंद्रपूर येथे मोटार वाहन कायद्यान्वये कार्यवाही करण्यात आली आहे. ज्यावाहनचालकाकडे वाहन चालविण्याचा परवाना नाही अशा वाहन मालकांवरही कार्यवाही करण्यात येणार आहे. कार्यवाही करण्यात आलेली सर्व वाहने वाहतुक शाखा, चंद्रपूर येथे जमा ठेवण्यात आली असुन सर्व वाहनांचे कागदपत्र पडताळुन पुढिल कार्यवाही वाहतुक पोलीस करीत आहे.

वाहतुक नियमांचा भंग करणाऱ्या वाहनांची माहिती व फोटो वाहतुक शाखेचा वॉट्सअॅप क्रमांक **7887891038** यावर नागरिकांनी पाठवावा असे आवाहन चंद्रपुर पोलीस विभागातर्फे करण्यात येत आहे.

---